# लोकलमध्ये सीटवरुन वाद, प्रवाशांमध्ये तुफान हाणामारी

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुंबई** प्रतिनिधी

मध्य, पश्चिम किंवा हार्बर.. लोकल ट्रेनच्या तिन्ही मार्गांवर प्रवाशांना नेहमीच गर्दीचा सामना करावा लागतो. ऑफिस, कॉलेजच्या वेळांमध्ये लोकल ट्रेनमध्ये सर्वात जास्त गर्दी असते. अशा वेळी ट्रेनमध्ये नीट उभं राहायला नीट जागाही नसते. अशा वेळी ट्रेनमध्ये जागेवर, उभं राहण्यावरुन वाद, भांडण होत असल्याचे पाहायला मिळते. अशीच एक घटना पुन्हा एकदा घडली आहे. नवी मुंबईत पुन्हा एकदा लोकल ट्रेनमध्ये प्रवासी सीटसाठी आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. प्रवाशांमध्ये सीटसाठी हाणामारी देखील झाली. ही हाणामारीची घटना हार्बर मार्गावरील पनवेल-सीएसएमटी लोकलमध्ये सानपाडा स्टेशनदरम्यान घडली आहे. या हाणामारीच्या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. सानपाडा स्टेशनदरम्यान पनवेल-सीएसएमटी लोकलमध्ये सीटसाठी झालेल्या वादात प्रवाशांमध्ये हाणामारी झाली.

## महत्वाचे

### बकऱ्या चोरणारी टोळी गजाआड

**जळगाव–** शहरातील शनिपेठ परिसरातून बकऱ्या चोरीला गेल्याच्या वाढत्या घटनांमुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण होते. या संदर्भात सय्यद परवेझ सय्यद आसिफ यांनी ९ सप्टेंबर रोजी शनिपेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली होती. २७ ऑगस्ट रोजी त्यांचा ७ हजार रुपये किमतीचा बोकड आणि आवेश शेख यांची ६ हजार रुपये किमतीची बकरी चोरीला गेल्याचे त्यांनी तक्रारीत नमूद केले होते. या तक्रारीनंतर पोलिसांनी तात्काळ गुन्हा दाखल करत तपास सुरू केला. या प्रकरणाचा तपास स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शरद बागल आणि त्यांच्या पथकाने सुरू केला. तपासानंतर पोलिसांनी गणेश वासुदेव जाधव (वय २०), गणेश अशोक पाटील (वय २१) आणि अक्षय विजय वंजारी (वय २३) या तीन आरोपींना ताब्यात घेतले. सखोल चौकशीत त्यांनी चोरीची कबुली दिली. एवढंच नव्हे, तर त्यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतूनही तीन बकऱ्या चोरल्याचे कबूल केले.

### अल्पवयीन मुलीला फूस लावून पळविले

**जळगाव –** शहरातील एका भागात राहणाऱ्या परप्रांतीय एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलीला अज्ञात व्यक्तीने मंगळवार ९ सप्टेंबर रोजी रात्री ९ वाजता काहीतरी अमिष दाखवून फूस लावून पळवून नेल्याची धक्कादायक घटना समोर आले आहे. या संदर्भात बुधवारी १० सप्टेंबर रोजी दुपारी ३.३० वाजता जळगाव तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्ती विरोधात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उत्तर प्रदेश राज्यातील गाजीपूरा येथील रहिवासी असलेली १६ वर्षीय अल्पवयीन मुलगी आपल्या कुटुंबीयांसह जळगाव शहरातील एका भागात वास्तव्याला आहे. मंगळवारी ९ सप्टेंबर रोजी रात्री ९ वाजेच्या सुमारास दुकानावर जाते असे सांगून गेली होती. दरम्यान तिला अज्ञात व्यक्तीने काहीतरी आमिष दाखवून फूस लावून पळवून नेल्याची तक्रार पीडित मुलीच्या पालकांनी केली. दरम्यान या संदर्भात त्यांनी जळगाव तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.

### डाळ व्यापाऱ्याला चक्क छत्तीस लाखांचा गंडा

**जळगाव –** जळगाव एमआयडीसीतील सी-सेक्टर मधील डाळ व्यापाऱ्याची तब्बल ३६ लाखांहून अधिक रुपयांची फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. येथील 'सक्षम उद्योग'चे मालक विनोदकुमार चंचलचंद जैन यांची, दलाल आणि तीन व्यापाऱ्यांनी संगनमताने मोठी आर्थिक फसवणूक केली आहे. या प्रकरणी बुधवारी १० सप्टेंबर रोजी मध्यरात्री १ वाजता एमआयडीसी पोलिसांनी तातडीने कारवाई करत चार संशयितांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, त्यापैकी एकाला अटक करण्यात आली आहे. गेल्या २० वर्षांपासून डाळ प्रक्रिया उद्योगात असलेले विनोदकुमार जैन यांनी पोलिसांकडे दिलेल्या फिर्यादीनुसार, बालाजी ट्रेडिंगचा दलाल सूर्यकांत उर्फ राज संजय व्यास याने त्यांचा विश्वास संपादन केला. मोठ्या प्रमाणात डाळ हवी असल्याचे सांगितले.

# तापी जनविकास संस्थेतर्फे गणेश मंडळांना ढाल वितरण

## उत्कृष्ट आरास देखावे सादर केलेल्या गणेश मंडळांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पाचोरा** प्रतिनिधी

येथे गिरणा-तापी जनविकास पर्यावरण संस्था, पाचोरा भडगाव संस्थेतर्फे पर्यावरण रक्षण व संवर्धन, लोकसंख्या नियंत्रण, राष्ट्रीय एकात्मता, स्त्रीभ्रूण हत्या विरोध, देहदान व अवयव दान या विषयांवर उत्कृष्ट आरास देखावे सादर केलेल्या गणेश मंडळांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस स्वरूपात ढाली देण्यात आल्यात. पर्यावरण रक्षण व संवर्धन या विषया वरील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मरणार्थ पहिल्या क्रमांकाची ढाल पांचाळेश्वर गणेश मित्र मंडळ, कोंडवाडी गल्ली व जयहिंद क्रिडा व लेझीम मंडळ, कृष्णापूरी यांना दत्तात्रय पाटील व शीला पाटील यांच्या हस्ते देण्यात आली. लोकसंख्या नियंत्रण या विषयावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि प्रा. रघुनाथ धोंडो कर्वे यांच्या



स्मरणार्थ पहिल्या क्रमांकाची ढाल रंगारगल्ली सार्वजनिक गणेश उत्सव मंडळ व जय मल्हार गणेश मंडळ, देशमुखवाडी यांना आर. पी. बागुल व विलास जोशी यांच्या हस्ते देण्यात आली, राष्ट्रीय एकात्मता या विषयावरील शहिद भगतसिंग यांच्या स्मरणार्थ पहिल्या क्रमांकाची ढाल जय मल्हार गणेश मंडळ, देशमुखवाडी यांना शीला पाटील, के. डी. पाटील यांच्या हस्ते देण्यात आली. स्त्रीभ्रूण हत्या विरोध या विषयावरील क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मरणार्थ पहिल्या क्रमांकाची ढाल श्री गणेश लक्ष्मी प्रतिष्ठान, गाडगेबाबा नगर यांना उज्वला महाजन, अशोक महाजन यांच्या हस्ते देण्यात आली. देहदान व अवयव दान या विषयावरील कॉम्रेड ज्योती बसू यांच्या स्मरणार्थ पहिल्या क्रमांकाची ढाल पांचाळेश्वर मित्र मंडळ, कोंडवाडा गल्ली यांना प्राचार्य डी. एफ. पाटील, वृषाली चव्हाण, प्रा. गोकुळ चव्हाण (मुंबई) यांच्या हस्ते देण्यात आली. राष्ट्रीय एकात्मता या विषयावरील दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकाच्या ढाली लालबागचा राजा गणेश मंडळ व बालजी मित्र मंडळ यांना यतीन मोदी व कैलास अहिरे यांच्या हस्ते देण्यात आल्यात तर पर्यावरण रक्षण व संवर्धन या विषयावरील तिसऱ्या क्रमांकाची ढाल संगीता भरतकुमार प्रजापत यांच्या हस्ते श्री गणेश मित्र मंडळ बाहेरपुरा यांना देण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वृषाली गोकुळ चव्हाण (मुंबई) या होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आनंद नवगिरे यांनी केले. या प्रसंगी गिरणा-तापी जनविकास पर्यावरण संस्थेचे अध्यक्ष विलास जोशी, शीला पाटील, उज्वला महाजन, विद्या कोतकर, प्रा. डॉ. सुनिता मांडोळे, नयना कापुरे यांनी मनोगते व्यक्त केलीत. कार्यक्रमाचे सूत्र संचालन उज्वला महाजन यांनी केले, तर आभार वर्षा राठोड यांनी मानले.

# ओबीसी संघटनांचे तहसीलदारांना निवेदन



**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मलकापूर** प्रतिनिधी

राज्य शासनाने मराठा आरक्षणा संदर्भात काढलेला चुकिचा जी. आर. रद्द करुन ओबीसी आरक्षणामध्ये मराठा समाजाचा समावेश करण्यात येऊ नये या आशयाचे निवेदन दि. ०९ सप्टेंबर रोजी येथील ओबीसी संघटनांच्या वतीने तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटल्याप्रमाणे मराठा समाजाचा समावेश ओबीसी मध्ये न करता त्यांना वेगळे आरक्षण देण्यात यावे. ओबीसींचे आरक्षण अबाधित ठेवून गावगाड्यातील सामाजिक मागासलेल्या शेकडो जातींना आर्थिक, सामाजिक व राजकीय प्रक्रियेत आपले अस्तित्व निर्माण करण्याची संधी कायम ठेवण्यासाठी ओबीसी आरक्षणात मराठा समाजाचा समावेश करण्यात येऊ नये. यावेळी सुभाष बावस्कार, गजानन भोपळे, अमोल राऊत, संजय देवकर, संतोष बोंबटकार, अ. भा. म. फुले समता परिषदेचे तालुका अध्यक्ष, पंकज देविकार, शहर अध्यक्ष दिपक बावस्कार, गजानन देवकर, अमोल राऊत, दिपक सातव, गजानन भोपळे, अमोल बगाडे, निनाजी घाटे, मनोज बगाडे, गोपाल बोचरे, अरुण घुटे, पंकज सातव, डॉ, नितीन भुजबळ, किशोर राऊत, रवी वानखेडे, रामेश्वर वानखडे, एकनाथ करांगळे, गणेश गवळी, उमेश ताठे, श्रीधर देवकर, संतोष बोचरे, मंगेश सातव, गोपाल चोपडे आदी उपस्थित होते.

# वाकलेल्या विजेच्या खांबाबाबत महावितरणला निवेदन

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**धामोडी** प्रतिनिधी

धामोडी गावाच्या मुख्य रस्त्यावर वीज वितरण कंपनीचा एक विजेचा खांब धोकादायक स्वरूपात वाकलेला असून त्यामुळे नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला आहे. याबाबत ग्रामस्थांनी उपकार्यकारी अभियंता, महावितरण उपविभाग रावेर यांना निवेदन देऊन तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. अन्यथा आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. धामोडी रस्त्यावर असलेला हा खांब काही दिवसांपासून झुकलेला असून त्यावरून जाणाऱ्या विजेच्या ताराही झुकलेल्या आहेत. त्यामुळे रस्त्यावरून



जाणाऱ्या वाहनचालक, पादचारी तसेच शाळकरी मुलांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. पावसाळ्याच्या दिवसांत जोरदार वाऱ्यामुळे हा खांब कोसळण्याची पूर्ण शक्यता असल्याने ग्रामस्थांत भीतीचे वातावरण आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, या संदर्भात अनेक वेळा तोंडी तक्रारी करण्यात आल्या तसेच वृत्तपत्रात बातम्या देखील प्रसिद्ध झाल्या आहेत. तरीदेखील महावितरण विभागाकडून कोणतीही कार्यवाही झालेली नाही. "दुर्घटना घडल्यास याची पूर्ण जबाबदारी वीज वितरण कंपनीवर राहील, " असा इशारा नागरिकांनी दिला आहे. ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनात स्पष्ट नमूद करण्यात आले आहे की, तातडीने या धोकादायक खांबाची दुरुस्ती अथवा नवीन खांब बसवावा. अन्यथा महावितरण कार्यालयावर तीव्र आंदोलन छेडले जाईल. निवेदन देताना सामाजिक कार्यकर्ते दिपक रत्नपारखे व रविंद्र मेढे उपस्थित होते. त्यांनी या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेऊन नागरिकांच्या सुरक्षेसाठी तातडीने पावले उचलण्याची मागणी केली आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याचा तिढा सुटला

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**सोयगाव** प्रतिनिधी

जरंडी येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याला मंजुरीसाठी गुरुवारी सकाळी साडे दहा वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात पुतळा समितीच्या बैठकीत पुतळा उभारणी साठी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक नियोजित असल्याचे गटविकास अधिकारी दादाराव अहिरे यांनी सांगितले. या बैठकीत पुतळा प्रस्तावात दाखल केलेले सर्व शपथ पत्र व नियोजित जागेच्या गुगल मॅप सह नकाशे घेऊन येण्याची सूचना तहसीलदार, ग्रामविकास अधिकारी, यांना देण्यात आलेल्या आहेत. गुरुवारी सकाळी साडे दहा वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात या बैठकीत निर्णय घेऊन पुतळा उभारणी साठी वेग येणार आहे. त्यामुळे आता जरंडीच्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळा उभारणी साठी मार्ग मोकळा झाला आहे. या बैठकीला अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलीस अधीक्षक डॉ विनयकुमार राठोड, तहसीलदार मनीषा मेने, गटविकास अधिकारी दादाराव अहिरे, ग्राम पंचायत अधिकारी सुनील मंगरुळे आदी उपस्थित राहणार आहे.

# कॅम्पस प्लेसमेंट अंतर्गत तरुणाची पुण्यात निवड

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

एम. जे. कॉलेजच्या ट्रेनिंग व प्लेसमेंट सेंटरतर्फे आयोजित कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये टी. वाय. बीसीए वर्गातील युगंधर जंगले या विद्यार्थ्याची पुणे येथील बीटीबी वेंचर या नामांकित कंपनीमध्ये निवड झाली आहे. या विद्यार्थ्याला समन्वयक डॉ. विवेक यावलकर यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय भारंबे, वाणिज्य व



व्यवस्थापन शाखेचे उपप्राचार्य डॉ. सुरेखा पालवे, अधिष्ठाता डॉ. अब्दुल कादीर आरसीवाला यांनी अभिनंदन केले आहे.

# दुर्गा मराठे यांना आदिशक्ती नारी सन्मान पुरस्कार प्रदान

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुक्ताईनगर** प्रतिनिधी

वारकरी भूषण सहकार महर्षी संत मुक्ताबाई संस्थान, मुक्ताईनगरचे माजी अध्यक्ष स्व. भाऊसाहेब प्रल्हादराव एकनाथराव पाटील यांच्या २१व्या पुण्यतिथी निमित्त संत मुक्ताई जुने मंदिर, श्रीक्षेत्र कोथळी येथे आयोजित पंचदिनी निळोबाराय गाथा पारायण व नामसंकीर्तन सोहळा दि. ७ ते ११ सप्टेंबर २०२५ दरम्यान अत्यंत भक्तिभावात पार पडला. गाथा पारायणाचे व्यासपीठ



हरिभक्त परायण संदीपन महाराज खामनीकर यांनी सजवले होते. दि. ११ सप्टेंबर रोजी पुण्यतिथी दिनी ह. भ. प. रविंद्र महाराज हरणे यांच्या काल्याच्या कीर्तनाने या पंचदिनी सोहळ्याची भक्तिरसात सांगता झाली. या वर्षीपासून स्व. भाऊसाहेबांच्या स्मरणार्थ संत मुक्ताबाई संस्थानच्या वतीने सुरु करण्यात आलेल्या "आदिशक्ती नारी सन्मान पुरस्कार २०२५" या पुरस्काराने सौ. दुर्गाताई संतोष मराठे यांचा सन्मान करण्यात आला. या पुरस्कार अंतर्गत त्यांना मानपत्र, ११ हजार रुपये रोख रक्कम व संत मुक्ताई साहेबांचे मानाचे महावस्त्र प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाच्या वेळी मुक्ताईनगर येथील पत्रकार बांधवांचा देखील शाल, श्रीफळ व ब्रह्मचित्कला संत मुक्ताई गाथा ग्रंथ देऊन गौरव करण्यात आला. या भाविकतेने भारलेल्या सोहळ्यास ॲड. रवींद्र भैय्यासाहेब पाटील (अध्यक्ष, संत मुक्ताबाई संस्थान), अण्णासाहेब जयंतराव महल्ले, डॉ. एस. आर. पाटील, वसंत पंढरी पाटील, संत मुक्ताई पालखी सोहळा प्रमुख रविंद्र हरणे महाराज, मंदिर व्यवस्थापक उद्धव जुनारे महाराज व इतर मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सांगता सोहळ्यात संस्थानचे अध्यक्ष ॲड. रवींद्र भैय्यासाहेब पाटील यांनी स्व. भाऊसाहेबांच्या स्मृतींना उजाळा देताना भावनावश होऊन अश्रूंना वाट मोकळी करून दिली. त्यांच्या या भावना पाहून उपस्थित भाविकांच्याही डोळ्यांत अश्रू तरळले. संपूर्ण कार्यक्रमात किर्तनकार, कथावाचक, टाळकरी, माळकरी, गायनाचार्य, मृदंगाचार्य आणि हजारो भाविक वारकरी सहभागी झाले होते.

# मुंबईत होणाऱ्या कलावंत मेळाव्या संदर्भात चर्चा सभा

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**अमरावती** प्रतिनिधी

महाराष्ट्रातील लोककलेला प्रोत्साहन देण्यासाठी व महाराष्ट्राची संस्कृती व परंपरा जपण्यासाठी तसेच कलावंताना हक्काचे व्सासपीठ उपलब्ध करून देण्याकरिता व नव्या पिढीला सांस्कृतिक वारसा समजावून सांगण्याकरिता शरद प्रतिभाषाली सांस्कृतिक प्रतिष्ठान २०२४ यांच्या विद्यमाने रवींद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी मुंबई येथे येणाऱ्या २१ सप्टेंबर २०२५ रोजी भव्य महाराष्ट्र राज्यस्तरीय कलावंत मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्या संदर्भात चर्चा




करण्याकरिता ८ सप्टेंबर २०२५ रोजी मुंबई येथील शरद प्रतिभाशाली सांस्कृतिक प्रतिष्ठानचे सन्माननीय संस्थापक अध्यक्ष, कोयना रत्न, भजन सम्राट, राजाराम बुवा शेलार व सातारा जिल्हाध्यक्ष संदीप शिंदे, अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष रामनाथ भोजने, तसेच राज्य कार्यकारिणी सदस्य शशीकांत गोळे, वाई तालुका अध्यक्ष डॉक्टर अमित शिंदे, संभाजीनगर जिल्हाध्यक्ष एडवोकेट पंजाबराव मोरे, यांच्या प्रमुख उपस्थितीत अमरावती जिल्ह्यातील गुरुकुंज मोझरी येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज महासमाधीस्थळी श्री गुरुदेव अध्यात्म गुरुकुल आश्रम येथे विदर्भातील जिल्हाध्यक्ष व पदाधिकाऱ्यांशी २१ सप्टेंबर रोजी मुंबईतील रवींद्र नाट्य मंदिर मुंबई येथे होणाऱ्या राज्यस्तरीय कलावंत मेळावा संदर्भात चर्चा करण्यासाठी सभेचे आयोजन करण्यात आले होते. सर्वप्रथम वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना अभिवादन करून सभेला सुरुवात करण्यात आली. या सभेमध्ये महाराष्ट्रातील सर्व कलावंतांनी २१ सप्टेंबर रोजी होणारा राज्यस्तरीय कलावंत मेळावा मोठ्या संख्येने मुंबईत दाखल होऊन मोठ्या उत्साहाने यशस्वी करण्याचा निर्धार केला. या मेळाव्यामध्ये मध्ये आपापल्या सादरीकरणासाठी सर्वांनी जोरदार तयारी करून यावे म्हणजे हा कार्यक्रम आपली कला जगभरात घेऊन जाणार आहे. त्यानंतर सर्व मान्यवरांना या मेळाव्याची निमंत्रण पत्रिका देण्यात आली. स्नेहभोजनाने या चर्चा सभेची सांगता करण्यात आली.

# मेहंदी स्पर्धेत अकरा महिलांना बक्षीस

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

भावसार समाज बहुउद्देशीय संस्थेच्या(बॉस) यांचे मार्फत नुकतेच महिलांसाठी ऑनलाईन मेहंदी स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेला उत्स्फूर्त असा प्रतिसाद भावसार समाजातील महिला स्पर्धकांनी दिला. स्पर्धेत सहभागी महिला महाराष्ट्र, गुजराथ, मध्यप्रदेश तामिळनाडू या राज्यातील होत्या. सर्व महिला स्पर्धेत ऑनलाईन मेहंदी काढून घेतल्या होत्या. निकाल देखील ऑनलाईन पद्धतीनेच प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक, असे ०३ विजेता उत्तेजनार्थ ०५




विजेता अशा एकूण ११ विजयी स्पर्धक यांना ऑनलाईन बक्षीस वितरीत करण्यात आले आहेत. हरतालिकेनिमित्त भावसार बहुद्देशीय संस्था यांच्या वतीने २६ ऑगस्ट २०२५ रोजी राज्यस्तरीय ऑनलाईन मेहंदी स्पर्धा आयोजित करण्यात आली. तत्पूर्वी या स्पर्धेसाठी महिलांनी ऑनलाइन पद्धतीने नाव नोंदणी केलेली होती. ऑनलाइन मेहंदी स्पर्धेचा निकाल २७ ऑगस्ट २०२५ रोजी घोषित करण्यात आला. या स्पर्धेत विजयी झालेल्या महिलांना ऑनलाइन पद्धतीने निकाल देऊन बक्षीसही ऑनलाइनच देण्यात आले. पहिले बक्षीस पाच हजार (५०००/-) रुपये, दुसरे बक्षीस अडीच हजार (२५००/-) रुपये, तिसरे बक्षीस दीड हजार (१५००/-)रुपये तसेच पाच विजयी महिलांना प्रोत्साहन पर प्रत्येकी दोनशे (२००/) रुपये तर उत्तेजनार्थ तीन बक्षिसे प्रत्येकी दोनशे रुपये प्रमाणे देण्यात आले. भावसार बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष कैलास भावसार, सचिव गिरीश भावसार यांनी कळविले.

# प्रकल्प लेखन व व्याख्यानातून विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती

## भगिनी मंडळ कला व वाणिज्य महाविद्यालयात पर्यावरण संवर्धन विषयावर कार्यशाळा उत्साहात

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**चोपडा** प्रतिनिधी

येथील भगिनी मंडळ संचलित कला वाणिज्य महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२५ - २६ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार पर्यावरण अभ्यास या विषयांतर्गत विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाविषयी जनजागृती व्हावी व युवकांच्या माध्यमातूनच पर्यावरण संवर्धन व्हावे, या उद्देशाने १ दिवसीय पर्यावरण संवर्धन कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यात पहिल्या सत्रात विद्यार्थ्यांकडून १) जल, जंगल, जमीन हीच राष्ट्राची खरी संपत्ती, २) पाणी आडवा - पाणी जिरवा, ३) वृक्ष संवर्धन काळाची गरज या विषयांवर प्रकल्प लिखाण करून घेण्यात आले, त्यानंतर प्रातिनिधिक स्वरूपात काही विद्यार्थ्यांनी आपल्या प्रकल्पांचे वाचन उपस्थितांसमोर केले. तद्नंतर दुसऱ्या सत्रात समाजकार्य महाविद्यालय,




चोपडा येथील प्रा. डॉ. अनंत देशमुख यांचे पर्यावरण संवर्धनात युवकांची भूमिका या विषयावर व्याख्यान झाले. विभाग प्रमुख डॉ. संजय चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यशाळेस प्राचार्य डॉ ईश्वर सौंदानकर, उपप्राचार्य डॉ. आशिष गुजराथी आदी मान्यवर उपस्थित होते. प्रा. डॉ. अनंत देशमुख यांनी आपल्या व्याख्यानात वृक्षारोपण तथा एक पेड़ माँ के नाम या मोहिमेत राष्ट्रीय कर्तव्य म्हणून प्रत्येक युवकाने उत्स्फूर्त सहभाग घ्यावा, प्रत्येकाने आपल्या वाढदिवशी १ झाड लावून त्याची निगा राखण्याची जबाबदारी घेतली पाहिजे, याशिवाय हवेतील प्रदूषण कमी व्हावे, यासाठी भविष्यात इलेक्ट्रिक वाहनांवर अधिक भर द्यावा, तीर्थस्थळांवरील नद्याचे संवर्धन करणे हेही पर्यावरणाच्या दृष्टीने गरजेचं आहे, हे सर्व साध्य करण्यासाठी युवकांच्या सहभागाची खूप आवश्यकता आहे, असे सांगितले. कार्यशाळेच्या यशस्वितेसाठी समन्वयक प्रा. अनिल बाविस्कर, समन्वयक प्रा. गोपाल बडगुजर, प्रा. सेजल शाह, प्रा. मोहिनी पाटील, प्रा. सुनिल पाचवणे, प्रा. प्रमोद वाघ, प्रा. भाग्यश्री महाजन यांनी परिश्रम घेतले. कार्यशाळेचे समन्वयक प्रा. अनिल बाविस्कर यांनी प्रास्ताविकातून कार्यशाळा आयोजनामागची भूमिका विशद केली. सूत्रसंचालन प्रा. मोहिनी पाटील यांनी केले तर प्रा. गोपाल बडगुजर यांनी आभार मानले. कार्यशाळेला महाविद्यालयातील १२० हून आधिक विद्यार्थी उपस्थित होते.